# प्रकरण १

# प्रास्ताविक

आज २१ व्या शतकात मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रचंड अशी प्रगती करुन भौतिक समृद्धी प्राप्त करुन घेतली आहे. पण ही भौतिक समृद्धी त्याला समाधान देऊ शकत नाही. आजही काहीतरी कमी असल्याची जाणीव माणसामध्ये सतत असते. तो जे शोधत असतो; जे त्याला सापडत नाही, आणि म्हणूनच तो पाठीवर आभाळ पडलेल्या सशासारखा नुसताच सैरभैर धावत सुटला आहे. त्याला समाधान हवे आहे, त्याला शांती हवी आहे. भौतिक समृद्धीने त्याला हे प्राप्त होणार नाही. हे त्याला समजून आले आहे. यासाठी तो अध्यात्मिकतेकडे वळला. त्यासाठी तो साहित्याकडे आकर्षित झाला. आपल्या इच्छा, आकांक्षापूर्तीसाठी तो साहित्याकडे वळला.

मराठी साहित्याचा मानदंड असलेले संतसाहित्य या दृष्टीने अलौकिक असे आहे. आज वैज्ञानिक युगामध्ये सुद्धा या साहित्याने आणि त्यातील सौंदर्याने आपला ठसा कायम ठेवला आहे. यातच त्याचे मोठेपण सामावले आहे. मराठी साहित्यातच नव्हे तर जगभरात संतसाहित्याने आपला वेगळा असा ठसा उमटवला आहे. ज्याला मराठी साहित्याचा अभ्यास करावयाचा असेल त्याला संतसाहित्य हे अभ्यासावेच लागेल. साधुसंतांची वाणी ही मौलिक कार्य करत असते. संतांच्या वाणीचा एखादाच हुंकार व्यापारपेठेचे तीर्थक्षेत्र करु शकतो. आंधळ्यास दिव्यदृष्टी देऊ शकतो. या दृष्टीने संत वाङ्मय हे महत्त्वपूर्ण कार्य करते. तो एक अमूल्य असा साठा आहे, अपूर्व देणगी आहे. म्हणूनच असे म्हटले जाते की –

''संत चरित्रे परमपवित्रे सादर वर्णावी''

महाराष्ट्रात असे एकही घर सापडणार नाही की; ज्यांना संत हे अनभिज्ञ असतील. मराठी माणूस व संतसाहित्य याची नाळ जन्मापासूनच कायम असते. ज्ञानोबा–तुकोबा यांच्या नावाची मोहिनी आजही महाराष्ट्रातील प्रत्येक वारकऱ्यांच्या मनावर कायम आहे. ज्ञानदेवांनी रचलेल्या भागवत धर्ममंदिराचा तुकाराम कळस झाले. मराठी साहित्यात सर्वात जास्त जिव्हाळ्याचे विषय ठरले ते तुकारामच !

वारकरी संप्रदायाचा कळस ठरलेल्या तुकारामांचा जन्म देहू या गावी झाला. भागवत धर्मात तुकोबानंतर त्यांचाइतका पारमार्थिक उंची लाभलेला संत झालाच नाही, आणि म्हणूनच



BARR BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

त्यांना दिलेली कळसाची उपमा यथार्थपणे लागू पडते. ज्याप्रमाणे केवळ कळसाचे दर्शन घेतल्यावर देवाच्या दर्शनाचे पुण्य पदरी पडते, त्याचप्रमाणे केवळ तुकारामांचे अभंग वाचल्याने भागवत धर्माचे रहस्य हाती लागते. म्हणूनच तुकारामांच्या कार्यास कळसाची दिलेली उपमा सार्थ आहे.

तुकारामांचा विचार हा त्यांच्या चरित्रापुरता किंवा अभंगापुरता मर्यादित नाही, तर त्यांचा विचार हा अखंडपणे करावा लागतो. यामध्ये अनेक प्रकारची परिवर्तने घडली, स्थित्यंतरे झाली, सामाजिक, राजकीय व धार्मिक स्थितीत प्रत्येक कालखंडात बदल होत गेले. अनेक संत महात्मे युगपुरुष झाले, क्रांती, चळवळी झाल्या पण तुकारामांचा विचार मात्र कायम राहिला. त्यांची भाषा व वाणी कायम राहिली. म्हणूनच तुकाराम महाराष्ट्राच्या मातीत शुद्ध बीज म्हणून रुजले, त्यांचा महावृक्ष झाला. त्याला फळेही रसाळ गोमटी लागली. अनेक अभंगातून त्यांनी आपली वेगवेगळी रूपे दाखवून दिली आहेत.

तुकारामांच्या या विविध वैशिष्ट्यांमुळेच संत परंपरेत त्यांचे वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. म्हणूनच वारकरी संप्रदायात 'ज्ञानाचा एका व नामाचा तुका' ही म्हण रुढ झाली आहे. संत परंपरेत कुणाही संताच्या चरित्राबाबत इतकी विविधता नसेल इतकी विविधता आपणास तुकारामांच्या चरित्रात दिसते. तुकारामांची वाणी आपल्याला ज्ञानेश्वरांच्या पेक्षा अधिक जवळची वाटते, कारण ज्ञानेश्वर मराठी वाचकांसमोर लहानाचे मोठे होत नाहीत, तर मोठे होऊनच आपल्या समोर येतात. ते कधीच लहान होते हे कबूल करायला मराठी मन तयार होत नाही. म्हणूनच ज्ञानेश्वर हे मराठी माणसांच्या आदरास पात्र ठरले तर तुकाराम त्यांच्या जिव्हाळ्याचे विषय बनले, आणि म्हणूनच ते कालखंडाचा प्रतिनिधी बनू शकले. आणि पुढील काळासाठी मानवाच्या स्वातंत्र्याचा, अस्मितेचा उद्‌गार ठरले.

या आणि अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वामुळे तुकाराम आजही प्रत्येक माणसाच्या मनात अभंगच आहेत. प्रत्येक माणसाला तुकारामांच्या या व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण आहे. या महान व्यक्तित्वाचा आपणही अणू एवढा अभ्यास करावा, त्यांच्या व्यक्तिमत्वात असणाऱ्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करावा असे मला प्रकर्षाने जाणवले. हा विचार करत असताना मला महाविद्यालयीन

शिक्षणात 'तुकारामांचे १०० अभंग' व उच्च महाविद्यालयीन शिक्षणात 'एका लेखकाचा अभ्यास मध्ययुगीन : तुकाराम' असे तुकारामांच्या बाबतचे दोन पेपर अभ्यासावयास मिळाले. त्यातूनच या अलौकिक व्यक्तिमत्त्वाबद्दल अधिकच जिव्हाळा निर्माण झाला. आणखीन नवीन काहीतरी अभ्यासावे असे वाटत असतानाच दि. बा. मोकाशी यांची 'आनंद ओवरी' व गो. नी. दांडेकर यांची 'तुका आकाशाएवढा' या दोन कादंबऱ्या माझ्या वाचनात आल्या.

गो. नी. दांडेकर हे मुळातच अध्यात्मिक प्रवृत्तीचे लेखक. आयुष्यातील बराच काळ त्यांनी वारकरी संप्रदायातच घालवला. वारकरी संप्रदायाचे संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेले आहेत. तेच संस्कार गोनीदांच्या 'तुका आकाशाएवढा' या कादंबरीतून दिसून येतात. वारकरी संप्रदाय, भारतीय नीतिमूल्यांची जपवणूक, संस्कारक्षम मन, रुढी परंपरा जपण्याची श्रद्धाळू वृत्ती या साऱ्याच वैशिष्ट्यांचा समावेश त्यांच्या 'तुका आकाशाएवढा' या कादंबरीत झाला आहे. ही त्यांची कादंबरी तुकारामांचे चरित्र अतिशय हळुवारपणे सांगत आपल्या मनाचा ठाव घेते. तुकारामांचे पारमार्थिक चरित्र सांगताना गोनीदा अधिक संवेदनशील, भावूक होतात. निवेदन पद्धतीमध्ये देखील नाविन्याचा उपयोग लेखकाने केलेला आहे. या वैशिष्ट्यांमुळेच ही कादंबरी मला वेगळी व आकर्षक वाटली.

त्याचप्रमाणे दि. बा. मोकाशी हे मानवी मनाला केंद्रभूत ठेऊन लिहितात. तीच त्यांची मूळ प्रवृत्ती आहे. मानवी मनाच्या भाव-भावना त्यातील वासना, सुख-दुःखे उलगडण्याचा ते प्रयत्न करतात. मनातील संघर्ष, त्यातील गूढता, ताण-तणाव हे देखील मोकाशी तितक्याच प्रत्ययतेने रेखाटतात. 'आनंद ओवरी' ही त्यांची कादंबरी काव्यात्मकतेकडे झुकलेली असून त्यातून त्यांनी तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतला आहे. हा शोध घेत असताना तुकारामांच्या मनाला ते केंद्रस्थानी ठेवतात. निवेदन पद्धतीमध्ये गोनीदांप्रमाणे मोकाशी देखील आपले वेगळेपण दाखवतात. त्यांनी तुकारामांचा धाकटा बंधू कान्होबा याच्या माध्यमातून हा शोध घेतलेला आहे. तुकारामांची व्यक्तिरेखा ही सामान्यातून असामान्य कशी झाली हे ते अतिशय तरल शब्दात सांगतात.

वरील दोन्ही कादंबऱ्यातील या वैशिष्ट्यांमुळेच व लेखकांच्या भिन्न प्रवृत्तीमुळे मला या दोन कादंबऱ्यांचे आकर्षण वाटले. या कादंबऱ्यातील या वेगळेपणाचा व सारखेपणाचा अभ्यास करावा हा एक दृष्टिकोन समोर ठेऊन मी या विषयाकडे वळाले. त्याचप्रमाणे आजपर्यंत संतसाहित्य म्हटले की प्रथम आपल्या डोळ्यासमोर येते ते अभंग, ओवी, गवळण, विराण्या असे पद्य साहित्य. पद्य साहित्यातूनच जास्तीत जास्त संतसाहित्य प्रचलीत आहे. उभय लेखकांच्या कादंबऱ्या वाचल्यानंतर गद्य साहित्यातूनही आपण संतसाहित्याचा, त्यातील सौंदर्याचा आस्वाद घेऊ शकतो ही गोष्ट मला वेगळी व नवीन वाटली. आणि म्हणूनच या दोन कादंबऱ्यातून दिसून येणाऱ्या 'तुकाराम दर्शनाचा' अभ्यास आपण एम्. फिल्. प्रबंधिकेत करावा या हेतूने हा अभ्यास विषय मी निवडला आहे.